सैनिक बँकेच्या निवडणुकीत सहकार पॅनलचा एकतर्फी विजय (पान ४ वर)




# पारनेर दर्शन




वर्ष १ अंक १४१, मंगळवार १३ फेब्रुवारी २०२४ ■ संपादक : देविदास आबूज ■ कार्यकारी संपादक : विजय वाघमारे RNI No.MAHMAR/2015/61493 किंमत : ३ रुपये

# बिगर पैशावाल्याने पैशावाल्यांना घाम फोडलाय!

## ■ आ. नीलेश लंके यांचे खा.डॉ. सुजय विखे यांच्यावर अप्रत्यक्ष टीकास्त्र ■ कामोठे येथे लंके प्रतिष्ठानचा स्नेहमेळावा उत्साहात

कामोठे : विशेष प्रतिनिधी

**जिवा भावाचे सहकारी असतील तर पैसे कशाला लागतात ? पैशावाल्याला घाम फुटलाय बिगर पैशावाल्यामुळे !पैशावाले फार आहेत. पैशावाले पैशावाल्यांना घाबरत नाहीत, बिगर पैशावाल्यामुळे त्यांना झोपही लागत नाही असे सांगत आमदार नीलेश लंके यांनी खासदार डॉ. सुजय विखे यांच्यावर टीकास्त्र सोडले.**

नीलेश लंके प्रतिष्ठाणच्या पाचव्या वर्धापनदिनानिमित्त कामोठे येथे आयोजित करण्यात आलेल्या स्नेहमेळाव्यात आ. नीलेश लंके यांनी उपस्थितांशी संवाद साधला.

यावेळी बोलताना आ. लंके म्हणाले, चार साडेचार वर्षापूर्वी तुमच्या सर्वांच्या आशिर्वादाने मला आमदारकीची संधी मिळाली. त्या संधीचे सोने करण्याचा मी प्रामाणिक प्रयत्न केला. माझ्या विजयामध्ये मुंबईकरांचा सिंहाचा वाटा आहे, हे मी कधी विसरणार नाही. माइ-या प्रत्येक अडचणीच्या काळात माझा मुंबईतील सहकारी गावाकडे आला. गावाकडे थांबून दोन रूपये खर्चही केले. मी साठ हजार मतांच्या फरकाने विजयी झालो त्याचे श्रेय मुंबईकरांना जात असल्याचे आ. लंके यांनी कृतज्ञतापुर्वक नमुद केले.

लंके पुढे म्हणाले, मुंबईमधील सहकाऱ्यांमध्ये नेहमीच तत्परता पहावयास मिळते. कोरोना संकटात जीवा भावाच्या सहकाऱ्यांनी मोठे काम केले. मी भाग्यवान आहे मला जीवा भावाचे सवंगडी मिळाले. माइ-या आई वडिलांप्रमाणेच जीवापाड प्रेम करणारे सहकारी मला मिळाले.राजकारण, समाजकारण होत असते. मात्र समाजाची बांधीलकी महत्वाची असते असे लंके यांनी सांगितले.

यावेळी राणीताई लंके, सुदाम पवार, सुनील काळभोर, बाबासाहेब तरटे, राहुल झावरे, भाऊ पवाडे, पुनम मुंगसे, सचिन गोडसे, राजेश्वरी कोठावळे, सुवर्णा धाडगे, उमाताई बोरूडे, अशोक घुले, नाना करंजुले, बाळासाहेब खिलारी, अभयसिंह नांगरे, कैलासशेठ धाडगे, अर्जुन भालेकर, संभाजी रोहोकले, नितीन अडसुळ, नंदकुमार देशमुख, डॉ. बाळासाहेब कावरे, प्रसाद नवले, शुभम शिरोळे यांच्यासह हजारो नगरकर यावेळी उपस्थित होते.



■ कामोठे येथे नीलेश लंके प्रतिष्ठाणच्या स्नेह मेळाव्यात आ. नीलेश लंके यांनी मार्गदर्शन केले.

### विक्रमी गर्दी

या मेळाव्यासाठी कामोठे येथील विद्यलयाच्या प्रांगणामध्ये विक्रमी गर्दी झाली होती. सर्व खुर्चा महिलांनी व्यापल्याने पुरूषांना उभे राहूनच मेळाव्यात सहभाग नोंदवावा लागला. सुप्याहून रॅलीने निघालेल्या आ. नीलेश लंके यांचे शिरूरपासूनच मोठया उत्साहाने स्वागत करण्यात येत होते. कामोठे येथे पोहचल्यानंतर ढोल ताशांच्या गजरात तसेच फटक्यांच्या आतिषबाजीत आ. लंके यांची जंगी मिरवणूक काढण्यात आली होती.

### चित्रफित आणि पुस्तक

कोरोना काळात आम्ही केलेल्या कामाची चित्रफीत तालुक्यातीलच काही सहकाऱ्यांनी तयार केली असून लवकरच ती प्रदर्शित करण्यात येणार असल्याचे सांगतानाच मी अनुभवलेला कोव्हिड या विषयावर आपण एक पुस्तकही लिहीले असल्याचे आ. लंके यांनी सांगितले.

### किती भाग्यवान मी ?

मी ज्या ज्या वेळी मुंबईकडे येतो त्यावेळी प्रत्येक ठिकाणी शंभर-दोनशे लोक स्वागतासाठी तयार असतात. मंत्रालयात कामानिमित्त येतो. सहकाऱ्यांना त्याची माहीती झाल्यानंतर मला हॉटेलचे जेवण आवडत नाही म्हणून चार-पाच जण जेवणाचे डबे घेउन येतात.इतके प्रेम कोणाच्या नशिबात असेल. किती भाग्यवान आहे मी ? असे सांगत आ. लंके यांनी सहकाऱ्यांविषयी कृतज्ञता व्यक्त केली.

### त्यांना शाळेत जा असे कसे सांगू शकता ?

कोव्हिड काळात मी जे अनुभवले ते कोणीही अनुभवले नसेल. कोरोना काळात गावाकडे आलेल्या बांधवांना दुय्यम वागणूक देण्याचा प्रयत्न झाला. मुंबईकर आले तर त्यांना घरात घेउ नका, शाळेत कॉरंटाईन करा असे सांगितले जात होते. मी गावागावात फीरलो, त्यांना सांगितले की, गावात शाळा, मंदीर, यात्रा आदींसाठी जर मुंबईकर लागत असतील तर आता त्यांना तुम्ही शाळेत जाण्यास कसे सांगू शकता ? त्यांना मान सन्मान दिला पाहिजे, त्यांना त्रास होता कामा नये हे समजावून सांगितले. काही ठिकाणी माझे वादही झाल्याचे आ. लंके म्हणाले.

### सत्ता संपत्ती क्षणिक

राजकारणात किती संपत्ती कमवली याला किंमत नाही तर राजकारण करत असताना लोकांच्या -हदयावर किती राज्य केले, लोकांना किती प्रतिसाद दिला हे महत्वाचे असते. सत्ता संपत्ती हे क्षणीक असते. आज ना उद्या ते जाणारे असते. सत्तेचा अमरपटटा कोणी घेऊन आलेला नाही. राजकारणात सत्ता नसतानाही लोकांनी डोक्यावर घेतले पाहिजे असे तुम्ही सत्ता असताना वागले पाहिजे. सत्ता आल्यानंतर लोकांच्या डोक्यात हवा जाते. पाच वर्षापूर्वी, दहा वर्षापूर्वी ज्या नीलेश लंकेला तुम्ही पाहिले तेच आजही तुम्ही पाहत आहात. काहीही बदल झालेला नाही. राजकारण, आमदारकी, सत्ता हे सर्व शुन्य असते. माझा जीवा भावाचा माणूस महत्वाचा असतो. सत्तेचा जास्तीत जास्त वापर माझ्या जीवा भावाच्या लोकांसाठी, सामान्य जनतेसाठी कसा करता येईल याचा प्रयत्न मी नेहमी करत असतो.

### राजयोग असेल तर

राजकाणात काय व्हायचे ते होईल. बऱ्याच लोकांनी तर्क, वितर्क काढले. २०२४ चे रणशिंग मुंबईमधून फुंकणार. लोकसभा निवडणूक लढण्याची घोषणा करणार. राजकारण सुरू असते. समयसे पहिले और भाग्यसे अधिक किसीको कुछ नही मिलता. राजयोग असेल तर झोपेत असेल तरी मिळेल. काहींनी रात्रंदिवस आपटली तरी काहीच होत नाही. हे महत्वाचे आहे. काय व्हायचे ते होईल. एव्हडे मिळाले तेच बोनस मिळाले आहे. मी कधी स्वप्नातही पाहिले नव्हते की ग्रामपंचायत सदस्य होईल. आमदार झालो. साडेचार वर्षे झाले तरी आजही विश्वास बसत नाही आमदार आहे म्हणून. ही सगळी तुमची कृपा असल्याचे लंके म्हणाले.

### न्याय देण्याची भूमिका

मी प्रामाणिकपणे सांगता माझ्याविषयी कोणाचा गैरसमज झाला असेल. एखाद्याचे काम झाले नसेल. परंतू कोणताही माणूस शंभर टक्के प्रत्येकाचे समाधान करू शकत नाही. माझे आंतरमन सांगते की प्रत्येकाला न्याय देण्यासाठी जीवाचे रान करतो. रात्रंदिवस त्यासाठी काम करतो. मंत्रालयात आल्यानंतर दिवस-दिवस जेवण करीत नाही. सकाळी दहा वाजता मंत्रालयात गेल्यानंतर रात्री आठ वाजता बाहेर येतो. चहाचा कपही घेत नाही. माझ्या माणसांना कसा न्याय देता येईल, कसा आधार देता येईल याची काळजी मी घेत असल्याचे लंके म्हणाले.

### कोरोना संकटात मदतीची भूमिका

ज्यावेळी मुंबईकरांना गावाकडे येण्यासाठी वाहने उपलब्ध होत नव्हती त्यावेळी आम्ही रात्र, रात्र कार्यालय सुरू ठेऊन मदत केली. संदीप चौधरी आणि इतर सहकारी यांनी रात्रंदिवस कार्यालयात बसून प्रत्येक मुंबईकरास मदत करण्याची भूमिका चोख निभावत आधार देण्याचे कर्तव्य बजावल्याचे आ. लंके म्हणाले.

### नि:स्वार्थ भावनेने माणसे कमविली

प्रतिष्ठाणच्या वर्धापनदिनासाठी महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातून सहका-यांनी हजेरी लावली हे माझे भाग्य आहे. मी नांदेड, सिंधूदुर्गला गेलो तर फार लांब आलोय असे वाटत नाही, मतदारसंघातच फिरतो आहे असे वाटते. राज्यात कोठेही गेलो तरी शंभर दोनशे लोक जमा होतात. यापेक्षा वेगळे काय हवे ? नि:स्वार्थी भावनेने काम केले तर माणसे जोडली जातात.

### संधीचे सोने करण्याचा प्रयत्न

मतदारसंघात गेल्यानंतर वीस वीस तास मी काम करतो. तुम्ही मला जी संधी दिली आहे त्या संधीचे मला सोने करता आले पाहिजे ही भावना महत्वाची असते. सामान्य माणसासाठी जे काही करता येईल ते करण्याचा मी प्रयत्न करतो असे लंके म्हणाले.

### आमची जीवा भावाची यंत्रणा

मी लाख मोलाची माणसं कमवली. एका फोनवर मुंबईला सातशे, आठशे गाडया आल्या. इतकी यंत्रणा आपल्याकडेच आहे. लोक म्हणतात आमच्याकडे मोठी यंत्रणा आहे. कशाची यंत्रणा ? आमची मात्र जीवा भावाची यंत्रणा आहे. नि:स्वार्थी प्रेम करणारी यंत्रणा आहे. तुमची असेल भाडोत्री यंत्रणा. आमचे पदर भाकरी खाउन फिरणारे लोक आहेत. काहींचा सध्या यंत्रणेवर जोर सुरू आहे. तुमच्याकडे नोकरी करणारे लोक ही यंत्रणा झाली का ? त्यांचाच महिन्याचा पगार कापून घ्यायचा, त्यांनाच कामाला लावायचे अशी त्यांची यंत्रणा आहे.

### एक रूपयाचही घरी नेला नाही

आमदार झाल्यापासून आतापर्यंत शंभर टक्के समाजासाठी जगलो आहे. एक रूपयाही घरी घेउन गेलेलो नाही. हे सगळयांना माहीती आहे. कोणी आरोप करीत असेल की याची इकडे जमीन आहे, तिकडे जमीन आहे. त्यात काहीही तथ्य नाही. आमचा दादा दळवी स्वत: गाडी चालविण्याचे काम करतो अनेकदा स्वत:च डिझेलही टाकतो. तो काही गर्भश्रीमंत नाही. असेच लाखमोलाची माणसे आम्ही कमवली आहेत. मला चिंता नाही. काही कमविण्यापेक्षा लोकांसाठी काहीतरी केले पाहिजे, लोकांच्या ह्दयावर राज्य केले पाहिजे हेच महत्वाचे असते असे लंके म्हणाले.

### पैशावाल्याला घाम फुटलाय

आमदार लोक एकत्र बसल्यानंतर स्पर्धा लागते. किती झाले आतापर्यंत ? मला विचारल्यानंतर आमचे काहीही नाही. बँकेत खाते आहे, त्याचीही कधी कधी अडचण निर्माण होते. कधी गाडीला डिझेल टाकण्याचीही अडचण असते. मात्र जीवा भावाचे सहकारी असतील तर पैसे कशाला लागतात ? पैशावाल्याला घाम फुटलाय बिगर पैशावाल्यामुळे ! पैशावाले फार आहेत. पैशावाले पैशावाल्यांना घाबरत नाहीत परंतू बिगर पैशावाल्यामुळे त्यांना झोपही लागत नाही.

### लोकप्रतिनिधीचे कर्तव्य पार पाडले

कोरोना सेंटर सुरू केल्यानंतर कोणत्या जाती, धर्माचा विचार केला नाही. मतदार संघाचाही विचार केला नाही. कर्नाटकाच्या रूग्णालाही घरातल्या रूग्णासारखे उपचार दिले. ज्यावेळी कुटूंबावर संकट येते, समाजावर संकट येते त्यावेळी लोकप्रतिनिधीचे तिथे कुटूंबप्रुमुख म्हणून तिथे धाउन जाणे हे कर्तव्य असते. ते कर्तव्य पार पाडण्याची जबादारी मी पार पाडली.

### अदृश्य शक्तीने मला सुरक्षित ठेवले

ज्या दिवशी कोव्हिड सेंटर सुरू केले त्या दिवशी सकाळी उठल्यानंतर आई वैष्णोदेवीचे दर्शन घेतले. माझा देह मी तुला अर्पण करून माझ्या लोकांचे संरक्षण करण्यासाठी निघालो आहे. तुला काय करायचे असेल ते कर. ज्या दिवशी कोव्हिड सेंटरमध्ये पावूल टाकले, मागचा पुढचा विचार न केला नाही. मलाही माहीती होते माझा शेवटही यात होणार आहे. मात्र माझ्या जीवा भावाच्या लोकांचे संरक्षण करण्यासाठी मी शेवटपर्यंत लढणार असा निर्धार मी केला होता. मी नि:स्वार्थी भावनेतून काम केले. परमेश्वराच्या अदृश्य शक्तीने मला सुरक्षित ठेवल्याचे लंके म्हणाले.

### कोव्हिडचे अनुकरण करा

पैसा वगैरे काही नाही. ज्याला आयुष्यात जगायचे आहे ना त्यांनी कोव्हीडचे अनुकरण करावे. ठाण्यात कोटयावधींची संपत्ती असलेल्या नगरसेवकाच्या अंत्यविधीसाठी कोणी उपस्थित नव्हते. कोव्हिड सेंटर सुरू झाल्यानंतर अनेकांचे फोन येत. आई-वडीलांना कोव्हिड झाला. ॲब्युलन्स पाठवा. घरी ५० लाख रूपयांची गाडी असताना आई वडिलांसाठी ॲब्युलन्स ? हे कशासाठी ? माझे, माझे हे म्हणतो हे सगळे शुन्य आहे. कोरोना काळात कोणी कोणाच्या मदतीला आले नाही. मी कोरोना काळात ३१ हजार लोकांच्या उपचाराची व्यवस्था केली.

### ३१ हजार कोरोना रूग्णांवर उपचार

कोरोनाची दुसरी लाट आली, त्यावेळी मी वैष्णोदेवीला होतो. जम्मूमध्ये मुक्कामी असताना सोशल मीडियावर फोटो आला. ४२ मृतदेहांवर रांगेत अंत्यसंस्कार करण्यात येत आहेत. मी रात्रभर बसून राहिलो. कधी माझ्या माणसांमध्ये उडून जाईल, त्यांचे संरक्षण करील याचा विचार करीत. तो दिवस ११ एप्रिलचा होता. एप्रिल रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीदिनी भाळवणी येथे १४ एप्रिल रोजी शरदचंद्र पवार आरोग्य मंदिर सुरू केले. त्या माध्यमातून ३१ हजार रूग्णांना उपचार देऊ शकल्याचे आ. लंके म्हणाले.

### हे कुठे जाणार आहे ?

सध्या समाजा समाजात, जाती जातीमध्ये सध्या तेढ निर्माण करण्याचा प्रयत्न होतो आहे. वेगळी भावना निर्माण झालेली आहे. हे कुठेतरी थांबले पाहिजे. हे कुठे जाणार आहे ? शेतकरी, उद्योजक यांचीही नाराजी पहावयास मिळत असल्याबद्दल आ. लंके यांनी खंत व्यक्त केली.

### खासदारकीची वर्दी!

काहीतरी चांगलं असावं लागतं, माणूस आपला असावा लागतो त्यामुळे इतकी गर्दी जमा होते. माणूसही असावा माणसातला दर्दी, दिली ताटातली भाकर सुध्दा अर्धी, नगर जिल्हयातील जनता म्हणते आहे आमदारकीनंतर आता खासदारकीची वर्दी असे सांगत जीतेश सरडे यांनी आ. लंके यांच्या कार्याचे कौतुक केले.

### कार्यक्रम यशस्वीतेसाठी प्रयत्न

नितीन चिकणे,भाऊ पावडे,सचिन गोडसे,दिनेश घोलप,गोपीनाथ पठारे, निलेश शिंदे, गोरख आहेर, गोविंद साबळे, चंद्रकांत नवले, सचिव अर्जुन डांगे, रोहिदास ढेरंगे, अशोक घुले,शालिनी घुले, सिमा पावडे, स्वाती लंके, शैला गुंड, प्रवीण साबळे, पिरताजी घुले, कामोठे शहराध्यक्ष विठ्ठल गलांडे, भाऊसाहेब आहेर, नाना निमसे, शंकर चिकणे, सचिन आंधळे, रवी घोलप, नंदकुमार गंधाक्ते, शशी घाडगे, अशोक जाधव, स्वप्निल चौधरी, निवृत्ती घाडगे, माऊली आहेर, राज आहेर, राहुल घुले, प्रदीप मस्के, शिवा वाफारे, योगेश आंधळे,रामदास घाडगे, दत्ता वाबळे, बाळू झिंजाड, मनीषा आग्रे यांच्या सह पदाधिकारी कार्यकर्त्यांनी विशेष परिश्रम घेतले.

### मुंबईकरांची उपस्थिती

राजू नाईकवाडी, सतीश पाटील, सूरदास गोवारी, सुनील गोवारी, संतोष चिखलकर, दौलत शिंदे, शालिनी घुले, सुवर्णा हाडोळे, उषा डुकरे, निलम आंधळे, विद्या मोहिते, वैशाली जगदाळे, विजया कदम, जयश्री सुद्रिक-झा, प्रमिला आहेर, निर्मला लटांबळे, सुनिता हुले, शरद गुंड, विजया मते, चिन्मय कुलथे.

### हे आहेत पुरस्कारार्थी

यावेळी पारनेर-नगर मतदारसंघातील विविध नागरीकांना पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले. वाळवणे येथील रहिवासी पोलीस उपायुक्त डॉ. सुधाकर पठारे यांना पोलीस विभागातील सेवेबद्दल, वैद्यकीय क्षेत्रातील सेवेबद्दल डिकसळ येथील डॉ. बाळकृष्ण अडसूळ तसेच रेनवडी येथील डॉ. राजेंद्र डेरे, शिक्षण क्षेत्रातील कामगिरीबद्दल रूईछत्रपती येथील गटशिक्षणाधिकारी नवनाथ साबळे, उद्योग क्षेत्रातील कार्याबद्दल म्हस्केवाडी येथील गोविंद साबळे, प्रशासकीय सेवेतील कार्याबद्दल दरोडीचे किसन पावडे यांना आ. लंके यांच्या हस्ते सन्मानित करण्यात आले.

### पत्र्याच्या घरातला माणूस आमदार झाला !

ज्यावेळी पक्षातून काढून टाकण्यात आले त्यावेळी चर्चा सुरू झाली की नीलेश लंके संपला कोणाच्या दावणीला बांधला जाणार, कोणापुढे झुकणार. पद गेल्यानंतर सर्वसामान्य माणसं ढसढसा रडली. रडणाऱ्या माणसाच्या खांद्यावर तोच हात पडला होता. पक्षाचे पद गेले तरी माणूस जिवंत आहे, कर्तुत्व जिवंत आहे. आता रडायचं नाही, आता लढायचं असा निर्धार करून पारनेर-नगर मतदार संघातील जनता एकदिलाने लढली. साठ हजार मतांच्या मताधिक्क्याने आ. लंके यांना विधानसभेत पाठविले. पत्र्याच्या घरात राहणारा माणूस आमदार झाल्याचे आ. लंके म्हणाले.






स्मार्ट शेतकरी, स्मार्ट शेती

# शिवार

**परसबागेचा आकार हा जागेची उपलब्धता, कुटुंबातील सदस्यांची संख्या यावर अवलंबून असते. गरजेनुसार भाजीपाला लागवडीसाठी वाफे आणि गरजेप्रमाणे सरी वरंबे करावेत. परसबागेच्या कुंपणाच्या बाजूला फळझाडे लावावीत. प्रत्येक कुटुंबाने समतोल आहार व पोषण तत्त्वे समजून घेणे महत्त्वाचे आहे. समतोल आहारामध्ये प्रत्येक व्यक्तींची गरज, शारीरिक कार्याचे स्वरूप लक्षात घेऊन पोषक घटक उपलब्ध होतात. अन्नातील रासायनिक घटक योग्य प्रमाणात आहारात घेतले असता शरीरातील सर्व कार्य सुरळीतपणे चालते, त्यास पोषणतत्त्वे म्हणतात.**

## पोषण परसबाग



### परसबागेचा आराखडा

परसबागेचा आकार हा जागेची उपलब्धता, कुटुंबातील व्यक्तींची संख्या यावर अवलंबून असते. आयताकार चांगला दिसतो. परसबाग तयार करण्याअगोदर जागा, पाण्याची उपलब्धता असावी. चार व्यक्तींच्या कुटुंबाची दैनंदिन आहारातील भाजीपाल्याची गरज पूर्ण करण्याकरिता साधारणतः ५० फूट जागा पुरेशी असते. परसबाग तयार करताना जमीन चांगली खणून घ्यावी. दगड गोटे, लहान खुरटी रोपे काढून जमीन सपाट करावी. जमिनीत शेणखत, गांडूळखत मिसळावे. जमीन हलकी असल्यास नदीकाठची गाळाची काळी माती मिसळावी. गरजेनुसार भाजीपाला लागवडीसाठी वाफे आणि गरजेप्रमाणे सरी वरंबे करावेत. बियाणे पेरणीसाठी रोपवाटिका करावी किंवा भाजीपाल्याची रोपे कुंडीत तयार करावीत. परसबागेच्या कुंपणाच्या बाजूला फळझाडे लावावीत. उदा. लिंबू, पेरू आदी. काही वेलवर्गीय भाजीपाला लावावा. उदा.दुधी भोपळा,कारली,दोडके आदी. वांगे, टोमॅटो, मिरची रोपांची लागवड वाफ्यामध्ये किंवा सरी वरंब्यावर करावी. पालक, मेथी, कोथिंबिरीची गादी वाफ्यावर लागवड करावी.

### पिकांचे व्यवस्थापन

विविध प्रकारच्या भाजीपाला पिकांची लागवड सपाट वाफे किंवा सरी वरंबा पद्धतीने करावी. रोपांची लागवड योग्य अंतरावर करावी. गरज पडल्यास विरळणी करावी. तण नियंत्रणासाठी वेळोवेळी खुरपणी करावी. पिकाच्या गरजेनुसार पाणी व्यवस्थापन करावे. परसबागेतील पिकांना रासायनिक खतांच्या ऐवजी सेंद्रिय खतांचा वापर करावा. परसबागेत सेंद्रिय खत तयार करण्यासाठी एका कोपऱ्यामध्ये झाडाच्या सावलीत जागा निवडावी. ३ फूट बाय ३ फूट बाय ३ फुटांचा खड्डा करावा. यामध्ये बागेतील पालापाचोळा, वाया जाणारा भाजीपाला टाकावा. अधूनमधून त्यामध्ये शेण व पाणी टाकावे. या खड्ड्यात गांडुळे सोडल्यास तीन महिन्यांत उत्तम प्रतीचे खत तयार होते. या खताचा वापर परसबागेत केल्यास पिकाची चांगली वाढ होते. उपयुक्त जिवाणूंची वाढ होऊन जमीन सुधारण्यास मदत होईल. पीकवाढीच्या अवस्थेत सेंद्रिय कीटकनाशकांचा वापर केला जातो. कीड नियंत्रणासाठी चिकट सापळ्यांचा वापर करावा. रोप लागवडीनंतर सुरुवातीचा काळात पाणी झारीने घ्यावे. अन्यथा वाहत्या पाण्याने रोपांच्या मुळाजवळील माती वाहून जाऊन मुळे उघडी पडू शकतात. वाढीच्या टप्पानुसार पाण्याचे नियोजन करावे. वाफसा ठेवावा. हिवाळा आणि उन्हाळ्यात पाणी देण्याची अवस्था ओळखण्यासाठी टोमॅटोची रोपे परसबागेत असणे आवश्यक आहे. पाण्याचा ताण पडताच सर्व प्रथम टोमॅटोची पाने मलूल होतात. यावेळी परसबागेला पाणी दयावे. पालेभाज्यांची सपाट वाफ्यात लागवड असल्याने जास्तीचे पाणी देऊ नये. भेंडी, वांगी, टोमॅटोची काढणीसाठी वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठाने विकसीत केलेल्या चिमटा आणि हातमोजाचा वापर करावा. भाजी दररोजच्या गरजे इतकी आणि स्वयंपाक सुरू करण्यापूर्वी परसबागेतून भाजी काढणी करावी. जेणेकरून भाज्यामध्ये असलेल्या पोषक घटकांचा ऱ्हास होणार नाही.

### पोषण परसबाग करण्यासाठी महत्त्वाच्या गोष्टी...

- कुटुंब सहभाग, लोक सहभाग
- वर्षभर पाण्याची उपलब्धता
- वेलासाठी मंडप, जनावरापासून रक्षण करण्यासाठी कुंपण.
- आवडीनुसार भाजीपाल्याची निवड.
- संकरित ऐवजी बियाण्यांचा वापर.
- उपलब्ध साधनसामग्रीचा वापर.
- संपूर्ण पोषणासाठी वेगवेगळ्या भाज्यांची खात्रीपूर्वक निवड.

### पोषण परसबाग संकल्पना

कमी खर्चात रोजच्या गरजेपुरत्या ताज्या सकस व चवदार भाज्या घरच्या घरी मिळविण्यासाठी घराच्या अंगणात किंवा उपलब्ध जागेत पोषण परसबाग तयार करता येते.

### परसबागेसाठी लागणारे साहित्य

- पाण्याची निचरा होणारी जमीन कमीत कमी ५०० चौरस मिटर.
- पाण्याची सुविधा, रूफलेन वॉटर हार्वेस्टींग टाकी
- पाणी देण्याचे साहित्य- झारी, पाईप,ठिबक सिंचन, तुषार सिंचन संच.
- बादली, मग
- शेणखत, सेंद्रिय खत- १ ट्रॉली.
- तळ्यातील माती २ ते ३ ट्रॉली.
- देशी बियाणे, रोपे आवश्यकतेनुसार.
- फावडे, कुदळ, खुरपी, टोपली.
- लांब दोरी, मिटर टेप
- चुना किंवा राख- १पोते.
- कुंपणाचे सामान

**खरीप हंगाम** : जुलै ते ऑक्टोबर- भेंडी, चवळी, गवार, मिरची, दोडकी, कारली, काकडी, दुधी भोपळा, मुळा, पालक, वांगी, टोमॅटो.
**रब्बी हंगाम** : ऑक्टोबर ते फेब्रुवारी- बटाटा, फ्लॉवर,कोबी, मुळा, गाजर, बीट, कांदा, लसूण, पालक, मेथी, शेपू इत्यादी.



## रोपवाटिका व्यवसाय लाभदायी!

**कोणत्याही पिकाचे किमान दीड ते दोन महिने आधी नियोजन केले असल्यास स्वतःच स्वतःची रोपे तयार करता येतात. मात्र, अनेक शेतकरी असे नियोजन करत नसल्यामुळे बाहेरून रोपे खरेदी करावी लागतात. ही बाजारपेठ गृहीत धरून काही शेतकऱ्यांना रोपवाटिका व्यवसाय करणे शक्य आहे. त्यातून चांगले अर्थार्जन होऊ शकते.**

रोपवाटिका किंवा कोणत्याही झाडाची अभिवृद्धी हे शास्त्र आणि कला यांचा संगम असतो. शेतकरी चांगल्या बियांचा सतत शोध घेऊन त्याद्वारे पीक घेत असतो. काही पिकांची पेरणी केली जाते, तर काही पिके हे रोपे तयार करून त्यांची पुनर्लागवड केली जाते. त्यात फळझाडे, वनशेतीतील काही दीर्घायू झाडे यांच्या निर्मितीचे तंत्र वेगवेगळे असते. या तंत्राचा काळजीपूर्वक वापर करावा लागतो. कारण बियांपासून अभिवृद्धी करताना मूळ झाडातील गुणधर्म जसेच्या तसे येतीलच, याची खात्री राहत नाही. त्यामुळे बियांपासून वाढवलेली झाडे एकसारखी वाढत नाहीत, त्यांच्या फळांच्या गुणवत्तेतही फरक जाणवतात. हे टाळण्यासाठी कलम करण्याच्या विविध पद्धती अगदी प्राचीन काळापासून वापरल्या जातात. उदा. चीनमध्ये लिची झाडावर गुटी कलम, तर भारतात कंदमुळापासून अभिवृद्धीचे तंत्र प्राचीन काळापासून अवगत आहे.

### रोपवाटिकेचे फायदे

- रोपवाटिकेमध्ये काळजी घेत बसण्याऐवजी दर्जेदार रोपे उपलब्ध होऊ शकतात.
- कलमे किंवा रोपे न करता त्वरित फळबाग लावता येते.
- रोप-कलमे निर्मितीचा वेळ, पैसा व श्रम वाचतात.
- रोपांच्या गुणवत्तेची खात्री घेता येते.
- दुर्मीळ कलमे सहजासहजी उपलब्ध होतात.



### रोपवाटिकेची गरज अन् संधी...

रोपवाटिका व्यवसायात योग्य जातींचे बी आणून, त्याची रोपे तयार केली जातात. त्यांची चांगली किंमतही मिळते. मात्र, यासाठी रोप निर्मात्यांची विश्वासार्हता महत्त्वाची असते. ही विश्वासार्हता सातत्यपूर्ण गुणवत्ता मिळवणे आणि टिकवण्यातून येत असते. उत्तम दर्जाचे रोपातून चांगले पीक आणि उत्तम उत्पादन मिळते, हे माहीत असल्याने विश्वासार्हता असलेल्या रोपवाटिकेतून शेतकरी चार पैसे अधिक देऊनही रोपे खरेदी करत असल्याचा अनुभव आहे. अलीकडे फळबागेखालील क्षेत्रात वाढ होत आहे. त्यामुळे नवीन फळझाडांची रोपे बनवणे शक्य आहे. त्याचप्रमाणे फुलझाडांच्या रोपांनाही चांगली मागणी असते. यात घरगुती सुशोभीकरणासाठी आणि व्यावसायिक लागवडीची असे दोन प्रकार पडतात. या दोन्हीमध्ये चांगली संधी आहे. उलट भाजीपाल्याच्या रोपांपेक्षा फळांची आणि फलांची कलमी रोपे अधिक किमतीने विकली जातात. त्यातून अधिक फायदा होतो.महाराष्ट्र आणि अन्य राज्यातूनही फळबाग लागवडीच्या विविध योजना राबवल्या जात असतात. अन्य विविध योजनांमध्येही झाडांचा समावेश असतो. उदा. रोजगार हमी योजना, फळबाग लागवड योजना, वृक्ष लागवड योजना, औषधी वनस्पती वृद्धी योजना यासारख्या योजनांची नेमकी माहिती करून घेतल्यास त्याच्या निकषानुसार रोपे बनवणे शक्य आहे. अशा वैशिष्ट्यपूर्ण रोपवाटिकांमध्ये सातत्याने चांगली मागणी असते.

### रोपवाटिका प्रस्थापित करताना हे पाहा...

- कोणत्या प्रकारची रोपवाटिका प्रस्थापित करावयाची आहे?
- रोपवाटिकेचा कालावधी.
- उत्पादित करणाऱ्या कलमे-रोपांची संख्या.
- आवश्यक जमीन उपलब्धता.
- सिंचनासाठी पाणी.
- कुशल मजुरांची उपलब्धता.
- मातृवृक्ष - स्वतःकडे लागवड की बाहेरून घेणार, त्याची गुणवत्ता.
- कलमे-रोपे करण्यासाठी आवश्यक निवारा.
- खुंट-रोपे वाढविण्यास जागा.
- कलम-रोपांना हार्डनिंग करणे.



### रोपवाटिकेचे प्रकार

- कोरडवाहू रोपवाटिका : पावसाच्या पाण्यावर अवलंबून असलेली रोपवाटिका, त्यावरच रोपाचे उत्पादन व संगोपन करण्यात येते.
- ओलिताखालची रोपवाटिका : या ठिकाणी बारमाही पाणी उपलब्ध असते, त्यावर रोपाचे व कलमाचे उत्पादन व संगोपन केले जाते.

### कालावधीनुसार रोपवाटिका

- तात्पुरती रोपवाटिका : कमी जागेत व कमी कालावधीमध्ये रोपे तयार केली जातात. विक्री करतात.
- कायम रोपवाटिका : या रोपवाटिकेमध्ये मोठ्या प्रमाणावर कलमे व रोपे तयार करतात. अशा रोपवाटिका रेल्वे व रोडपासून अगदी जवळ हव्यात. त्यामुळे रोपांची व कलमांची विक्री सोयीची होते.

## चिकू लागवड



**चिकू कलम लागवड करताना प्रत्येक खड्ड्यात मध्यभागी कलमाचा जोड जमिनीच्या वर राहील, याची काळजी घ्यावी. कलमाला काठीचा आधार द्यावा. चिकूचे झाड सावकाश वाढणारे असल्यामुळे त्यामध्ये पहिल्या सहा वर्षांच्या काळात आंतरपिके घ्यावीत. चिकू लागवडीसाठी पोयट्याची काळी कसदार जमीन निवडावी. काळ्या व भारी जमिनीत निचऱ्यासाठी चर खणून लागवड करावी. पाण्याचा योग्य निचरा होत नसलेल्या, चुनखडीचे प्रमाण जास्त असलेल्या जमिनीत चिकूची लागवड करू नये. चिकूची अभिवृद्धी भेट कलमाद्वारे केली जाते. चिकूची कलमे बांधण्यासाठी खिरणी खुंटाचा उपयोग करतात.**

### लागवड तंत्र

लागवड जुलै-ऑगस्ट महिन्यात करावी. नवीन बागेची लागवड करण्यापूर्वी जमिनीची नांगरणी व कुळवणी करून जमीन भुसभुशीत करून घ्यावी. १० बाय १० मीटर अंतरावर एक मीटर बाय एक मीटर बाय एक मीटर आकाराचे खड्डे करावे. पोयटा माती, २ ते ३ घमेले शेणखत, एक किलो सिंगल सुपर फॉस्फेट, निंबोळी पावडर २०० ग्रॅम या मिश्रणाने खड्डे भरून घ्यावेत. प्रत्येक खड्ड्यात मध्यभागी कलमाचा जोड जमिनीच्या वर राहील या पद्धतीने कलम लावावे. कलमाला काठीचा आधार द्यावा. लागवडीनंतर लगेच पाणी द्यावे.



### खते अन् पाणी व्यवस्थापन

झाडाची जलद वाढ होण्यासाठी खताच्या मात्रा दोन समान हप्त्यांत सप्टेंबर आणि जून या महिन्यांत विभागून द्याव्यात. पूर्ण वाढ झालेल्या झाडांना १०० किलो शेणखत, तीन किलो नत्र, दोन किलो स्फुरद व दोन किलो पालाश द्यावे. झाडाची चांगली वाढ आणि त्यापासून भरपूर उत्पादन मिळविण्यासाठी पाण्याच्या नियमित पाळ्या द्याव्यात. फुलोरा धरण्याच्या काळात तसेच फलधारणेच्या अवस्थेत चिकूच्या झाडाला पाण्याचा ताण पडल्यास फळांचा आकार लहान राहतो.

- वळण अन् छाटणी : झाडाची नियमित छाटणी करावी लागत नाही. मात्र सुरुवातीच्या काळात खिरणी खुंटावर येणारी फूट तसेच झाडाच्या खोडावर जमिनीपासून ५० सें. मी. उंचीपर्यंत येणारी नवीन फूट वेळोवेळी काढून टाकावी. झाडाला योग्य आकार देण्यासाठी आवश्यकतेनुसार छाटणी करावी.
- आंतरपिके घेताना : चिकूचे झाड सावकाश वाढणारे असल्यामुळे त्यामध्ये पहिले ५ ते ६ वर्षांच्या काळात आंतरपिके घ्यावीत. टोमॅटो, कोबी, वांगी, मिरची, लिली, निशिगंध या आंतरपिकांची लागवड फायदेशीर ठरते.
- फळांचे उत्पादन : फुलांचा पहिला बहार सप्टेंबर ते नोव्हेंबरमध्ये येतो. फुलांचा दुसरा बहार फेब्रुवारी- मार्च मध्ये येतो. साधारणपणे फुले आल्यानंतर फळधारणा होऊन फळे पक्व होण्यासाठी २४० ते २७० दिवसांचा कालावधी लागतो.
- जाती कोणत्या : कालीपत्ती, क्रिकेट बॉल, किर्ती-भारती, को-१, पिलीपत्ती, बारमाशी, पीकेएम-७, पीकेएम-२. यात कालीपत्ती ही लोकप्रिय जात आहे. कालीपत्तीची झाडे मोठी, विस्तारित असतात. पाने गर्द हिरवी असतात. फळे मोठी अंडाकृती आहेत. गर गोड आहे. पूर्ण वाढ झालेल्या झाडापासून दरवर्षी ३००० ते ४००० फळे मिळतात.



## शॉर्ट न्यूज

### आरपीआयचे तहसील कार्यालयासमोर उपोषण

■ **राहुरी :** पोलिस ठाण्यातील पोलिस उपनिरीक्षक समाधान पडोळ व ठाणे अंमलदार खेमनर यांच्या विरोधात ऑनलाईन तक्रार करुन देखील कोणतीही कारवाई न झाल्यामुळे संबंधित अधिकाऱ्यावर गुन्हा दाखल करण्यासाठी राहुरी पोलिस ठाण्या समोर आरपीआय च्या वतीने आमरण उपोषण करण्यात आले होते. आरपीआय चे राहुरी तालूकाध्यक्ष विलास साळवे हे त्यांच्या एका नातेवाईकांसोबत राहुरी पोलिस ठाण्यात गेले. त्यावेळी त्यांनी गुन्ह्यामध्ये अॅट्रोसीटी कलम लावण्याची मागणी केली होती. त्यावेळी पोलिसांनी मगरूरीची भाषा करुन सर्वांना बाहेर हाकलून दिले होते

### सोनईत उद्धव ठाकरेंची तोफ धडाडणार

■ **सोनई :** राज्याचे माजी मुख्यमंत्री उध्दव ठाकरे संवाद दोऱ्याच्या निमित्ताने दोन दिवस शिर्डी लोकसभा मतदारसंघाच्या दौऱ्यावर येत आहे. मंगळवार १३ फेब्रुवारी रोजी सकाळी १० वाजता नेवासा तालुक्यातील सोनई येथील जगदंबा मंदिर प्रांगणात जाहीर सभेला ते संबोधित करणार आहेत. आमदार शंकरराव गडाख यांच्या मार्गदर्शनाखाली ठाकरे यांच्या जिल्हा दौऱ्याचे संपूर्ण नियोजन करण्यात येत असल्याने यानिमित्ताने त्यांच्या भाजप प्रवेशाच्या वावड्यांना पूर्णविराम मिळाला आहे.

### मुलाखतीचे विशेष तंत्र आत्मसात करा

■ **श्रीरामपूर :** शासकीय आथवा खाजगी पदांच्या भरतीसाठी ज्या मुलाखती घेतल्या जातात त्यासाठी मुलाखतीचे तंत्र अवगत करुन पूर्वतयारी तसेच आत्मविश्वासाची गरज असते, असे प्रतिपादन स्वामी सहजानंद भारती महाविद्यालयाचे डॉ. विजय पाटोळे यांनी केले. माजी आ. भानुदास मुरकुटे यांचे मार्गदर्शनाखालील तालुक्यातील अशोकनगर येथील अशोक कारखाना संचलित कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयाने सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या विद्यार्थी कल्याण मंडळ अंतर्गत आयोजित तंत्र मुलाखतीचे विषयाबाबतच्या कार्यशाळेत मार्गदर्शन करताना डॉ. पाटोळे बोलत होते.

### पाणीटंचाई विरोधात मडका फोडो आंदोलन

■ **राहाता :** तालुक्यात ग्रामीण भागात सर्वात मोठया समजल्या जाणाऱ्या पुणतांबा गावात सध्या तीव्र पाणीटंचाई जाणवत आणून ग्रामपंचायत प्रशासनाने येत्या आठ दिवसांत पाणीपुरवठा सुरळीत केला नाही तर पुणतांबा ग्रामस्थांच्यावतीने पाणीटंचाईच्या विरोधात ग्रामपंचायत कार्यालयासमोर मडका फोडो आंदोलन करण्याचा इशारा मनसेचे तालुका प्रमुख गणेश जाधव यांनी दिला आहे.

### देडगाव परिसरात ईव्हीएमबद्दल जनजागृती

■ **नेवासा :** आगामी लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर नेवासा तालुक्यातील बालाजी देडगाव व परिसरातील गावात ईव्हीएम, व्हीव्हीपॅट मशिनबद्दल जनजागृती करण्यात आली. ईव्हीएम व व्हीव्हीपॅट मशिन प्रशिक्षण, प्रचार, प्रसार, प्रसिद्धी व जनजागृतीसाठी राज्याचे मुख्य निवडणूक अधिकारी यांच्या निर्दे शान्वये या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी प्रशासकीय अधिकाऱ्यांनी मतदारांना ईव्हीएम व व्हीव्हीपॅट मशिन व त्याच्या वापराबद्दल माहिती दिली.

# तलाठी नव्हे आता ग्राम महसूल अधिकारी!

**■ महसूल मंत्री विखे पाटील यांची राज्यस्तरीय अधिवेशनात घोषणा ■ संघटनेच्या नावातही बदल करण्यास राज्य सरकारची मान्यता**

**संभाजीनगर : प्रतिनिधी**

**गावपातळीवर महसूल विभागाचा चेहरा असलेल्या तलाठी पदनामात बदल करून ग्राम महसूल अधिकारी असे नाव देण्याची घोषणा महसूल मंत्री ना राधाकृष्ण विखे पाटील यांनी केली.तलाठी संघटनेच्या नावात बदल करण्यासही राज्य सरकारने मान्यता दिली असल्याचे त्यांनी सांगितले.**

छत्रपती संभाजीनगर येथे तलाठी संघटनेच्या राज्यस्तरीय अधिवेशनाचे उद्घाटन महसूल मंत्री ना.राधाकृष्ण विखे पाटील यांच्या हस्ते करण्यात आले पालकमंत्री संदीपान भुमरे यांच्यासह महसूल विभागाचे सर्व वरीष्ठ अधिकारी तसेच राज्यातून आलेले तलाठी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

संघटनेची मागणी लक्षात घेवून मंत्री विखे पाटील म्हणाले की तलाठी या पदनामात बदल करून ग्राम महसूल अधिकारी या नावास तत्वता मान्यता



देण्यात येत असल्याचे सांगून तलाठी संघटनेच्या नावात बदल करण्याची अनेक वर्षांपासूनची मागणी प्रलंबित होती.राज्यातील युती सरकारने याबाबत निर्णय करून आता संघटनेचे नाव महाराष्ट्र राज्य तलाठी संघ असे करण्यास मान्यता दिली असून त्याचा शासन आदेशच विखे पाटील यांनी अधिवेशनात दाखवला.मंत्री विखे पाटील यांनी केलेल्या घोषणांचे टाळ्यांच्या गजरात उपस्थितांनी स्वागत केले.

यापुर्वी एक सजा एक कोतवाल असे धोरण घेण्यात आले असून ३हजार ११०सजे निर्माण करण्यास शासनाने मान्यता देण्यात आल्याचे सांगतानाच महसूल सहायक व तलाठी संवर्गतील १०वर्ष सलग सेवा झालेल्या कर्मचार्यांना मर्यादीत विभागीय स्तरावर स्पर्धा परीक्षांना संधी देण्यासाठी तुमच्या हिताचा निर्णय शासन निश्चित करेल आशी ग्वाही मंत्री विखे पाटील यांनी दिली.महसूल विभागाचा चेहरा असलेले तलाठी सरकार प्रमाणेच सामाजिक बांधिलकीने काम करीत आहेत.कोणतेही सकंट असो आव्हानात्मक परीस्थीतीत सरकारचे प्रतिनिधी म्हणून आपण बजावत असलेल्या भूमिकेला सलाम करण्यासाठी या अधिवेशनात उपस्थित असल्याचे विखे पाटील यांनी आवर्जून सांगितले.

तलाठी भरती प्रक्रीया अतिशय पारदर्शी पध्दतीने राबविण्यात आली.परंतू केवळ शासनाला बदनाम करण्यासाठी आरोप केले जात आहे.विरोधकांच्या आरोपामुळे तुम्ही सुध्दा बदनाम होत असल्याची जाणीव करून आपल्या संघटनेने पुढे येवून या आरोपांचा निषेध करण्याचे आवाहन मंत्री विखे पाटील यांनी केले.

## एकमेकांचे नाव न घेता काका अन् पुतण्याने पुण्यात सोडले शब्दबाण

**■ काळानुरूप बदलायचे असते : अजित पवार ■ चौकशीतून सुटकेसाठी काहींचे पक्षांतर : पवार**

**पुणे : प्रतिनिधी**

**निवडणूक आयोगाकडून राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष आणि पक्षचिन्ह घड्याळाची मालकी अजित पवार यांच्याकडे दिल्यापासून आता शरद पवार आणि अजित पवार यांच्यातील शीतयुद्ध आणखी भडकले आहे. चौकशीच्या फेऱ्यांतून सुटण्यासाठी काही लोकांनी पक्षांतर केले, असा टोमणा राष्ट्रवादी काँग्रेसचे (एसपी) अध्यक्ष शरद पवार यांनी हाणला, तर आपण सेक्युलर विचारसरणी अजून सोडली नाही.**



तर एकाच धोरणावर अवलंबून न राहता काळानुरूप बदलले पाहिजे. यासाठीच आपण भाजपसोबत गेलो, असा युक्तिवाद राष्ट्रवादी काँग्रेसचे (एपी) राष्ट्रीय अध्यक्ष अजित पवार यांनी केला.

पुणे येथे पत्रकारांशी संवाद साधताना राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष (एसपी) शरद पवार म्हणाले, राज्याच्या विकासासाठी भाजपसोबत गेल्याचे काही जण सांगत आहेत. मात्र, त्यांच्या दाव्यात अजिबात तथ्य नाही. तपास यंत्रणांकडून काही नेत्यांची चौकशी सुरू होती. त्यातून सुटण्यासाठीच त्यांनी हा घरोबा केला असून ती चौकशी सत्तेत आल्यानंतर बंद झाली आहे. त्यामुळे विकासासाठी त्यांनी पक्ष सोडला. सेक्युलर विचारसरणी सोडलेली नाही, अनेकदा सांगितले आहे

सेक्युलर विचारसरणी आपण सोडलेली नाही. आपण भाजपसोबत का गेलो हे मी अनेकदा सांगितले आहे. मला तेच तेच सांगायचे नाही. आता आपल्याला विकासावर भर द्यायचा आहे. एकाच धोरणावर अवलंबून राहायचे नसते, काळानुरूप बदलायचे असते, असा टोला उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी लगावला. ते राष्ट्रवादी काँग्रेसच्या मेळाव्यात बोलत होते.

## वाचकांच्या लेखणीतून

## हरवले ते गवसले!

जनतेचा पोलिस दलावरील विश्वास कमी झाला अशी वृत्तपत्रीय बातमी वाचनात आली. पोलिस महासंचालक रश्मी शुक्ला यांनी राज्यातील जनतेला उद्देशून लिहिलेल्या पत्राशी या बातमीचा संदर्भ आहे. घोसाळकर यांच्या हत्येनंतर राज्यातील कायदा आणि सुरक्षा व्यवस्थेचा प्रश्न ऐरणीवर आला असल्याने पोलिस महासंचालकांच्या या पत्राला विशेष महत्त्व आहे. असेही या बातमीत म्हटले आहे.




महाराष्ट्र पोलिस हे देशातील सर्वोत्तम पोलिस दलांपैकी एक आहे. पोलिस महासंचालकांनी म्हटले आहे. तो विश्वास टिकविण्यासाठी जनतेची मने आपण जिंकली पाहिजेत. असे महासंचालकांनी म्हटले आहे. ते रास्तच आहे.

मतदानासाठी मतदान केंद्रावर गेलो. मी रांगेत उभा होतो. एकेकाला आत सोडले जाई. माझा नंबर आला. आतून एकाने या म्हणून मला बोलावले. मी आत पाऊल टाकताच आतून दुसऱ्याने आवाज दिला. थांबा थांबा. माझे पुढे पडलेले पाऊल मागे घ्यायच्या आत दरवाजातले हवालदार माझ्यावर खेकसले. ए! चल बाहेर हो! खरे तर त्या बिचाऱ्याचा काही दोष नव्हता. पण त्याने ज्या शब्दांनी आणि ज्या आवाजात मला अडवले ते साफ चुकीचे होते. मीही समजावण्याच्या स्वरात म्हटले, अहो, मी काही गुन्हेगार नाही. हे निवडणुकीचे मतदान केंद्र आहे. पोलीस चौकी नव्हे! तेव्हा ते हवालदार वरमले आणि मला नरमाईच्या सुरात म्हटले, आमची रोजची सवय आहे, साहेब. काय करणार त्याला!.....

**किसी गुमशुदा की तलाश में मेरी सारी उम्र गुज़र गई।**
**मगर इत्तिफ़ाक़ तो देखिये कि न अपने दिल पे नज़र गई।।**

ख़ुमार बाराबंकवी म्हणतात, काही तरी हरवले आहे ते शोधण्यात सारी हयात गेली. पण योगायोग पहा. माझ्या अंतर्मनात मी कधीच ढुंकून बघितले नाही!

**नाना ढवळे**
८२८६९१३२२३
**निघोज, ता. पारनेर,**
**जि. अहमदनगर.**

## गोरक्षनाथ गडावर धर्मनाथ बीज उत्सव संपन्न

हजारो भाविकांनी घेतला दर्शनाचा लाभ

**नगर : प्रतिनिधी**

**जवळील मांजरसुंभा येथील गोरक्षनाथ गडावर धर्मनाथ बीज उत्सव उत्साहात संपन्न झाली त्यानिमित्ताने विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते सकाळी अभिषेक,महापूजा उद्योजक शरद व मोहिनी तागड,राधाकिसन व रोहिणी भुतकर,बाबासाहेब व कविता कर्डीले,अनुराधा व रमेश बाबर,वैशाली व साईनाथ कुसमुडे,काजल व गोरक्षनाथ आव्हाड ,मंगेश रोकडे,भास्कर पाटील,विश्वनाथ दराडे,निखिल पाटकर,रवींद्र कात्रे,मीननाथ गडाख यांच्या हस्ते झाली.**





त्यानंतर आदिनाथ महाराज दानवे यांचे कीर्तन संपन्न झाले तर दुपारी १२ पासून पुढे सुदाम तागड,रमेश बाबर,साईनाथ ग्रुप,सावेडी,हरीश भोंगाडे,पाटकर साहेब,बाबासाहेब कर्डीले,रंगनाथ भोसले,राख साहेब,अनिल शर्मा,विठ्ठल आंबेकर,साईनाथ कुसमुडे व इतर अनेक नाथ भक्तांच्या वतीने महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते त्याचा लाभ रात्रीपर्यंत भाविकांनी घेतला

यावेळी अध्यक्ष अॅड.शंकरराव कदम,गोरक्षनाथ कदम,जयराम कदम, अॅड मारुती कदम,सरपंच जालिंदर कदम,गोरक्षनाथ महाराज ढोकणे,तुकाराम कदम,भास्कर कदम,अन्तोष कदम,सागर कदम यांच्यासह विश्वस्त व नाथभक्त व ग्रामस्थ मोठया संख्येने उपस्थित होते.

राज्यातून मोठ्या संख्येने भाविक उत्सवाला आले होते तसेच पारनेर तालुक्यातून सिद्धेश्वरवाडी येथून पायी दिंडी सोहळा आला होता.उत्सवानिमित्त मंदिराला लायटिंग व फुलाची आकर्षक अशी सजावट करण्यात आली होती पहाटे पासून रात्री उशीरपर्यंत मोठ्या संख्येने हजारो भाविक दर्शनाला आले होते

नाथपंथात महत्वाचा उत्सव धर्मनाथ बीज आहे,मच्छिन्द्रनाथ व गोरक्षनाथ भ्रमण करत प्रयाग राज्यात गेले असता तेथील त्रिविक्रम राजाला मुलबाळ नव्हते व ते लोककल्याणकारी राजे होते,त्याचे देहांत झाले हे पाहून गोरक्षनाथ दु:खी झाले त्यांनी मच्छिन्द्रनाथांना राजाला पुन्हा जिवंत करवायची विंनती केली तेंव्हा मच्छिन्द्रनाथांनी मृत राजाच्या शरीरात काया प्रवेश केला त्यामुळे राजा जिवंत झाला. त्यानंतर मच्छिन्द्रनाथपासून धर्मनाथाचा जन्म झाला धर्मनाथ १२ वर्षाचा झाल्यावर पुन्हा मच्छिन्द्रनाथ त्रिविक्रम राजाच्या देहातून बाहेर पडले व धर्मनाथाचा राज्याभिषेक करून प्रयागचा राजा केले व १२ वर्षांनी गोरक्षनाथ येऊन धर्मनाथास अनुग्रह देतील असे सांगितले १२ वर्षांनी मच्छिन्द्रनाथ व गोरक्षनाथ यांनी पुन्हा प्रयाग येथे येऊन माघ शु द्वितीयाला गोरक्षनाथांनी धर्मनाथाना सभारंभपूर्वक नाथसंप्रदायाची दीक्षा दिली

## माजी आमदार वल्लभ बेनके यांचे निधन

७४ व्या वर्षी घेतला अखेरचा श्वास

**जुन्नर : प्रतिनिधी**

**जुन्नरचे माजी आमदार वल्लभ बेनके यांचे नुकतेच अल्पशा आजाराने निधन झाले. ते ७४ वर्षांचे होते. वल्लभ बेनके हे शरद पवार यांचे अत्यंत निकटवर्तीय म्हणून ओळखले जायचे. जुन्नर तालुक्यातील घराघरात त्यांनी राष्ट्रवादी पोहचवण्याचे काम केले. वल्लभ बेनके यांचा जन्म २३ जून १९५० रोजी हिवरे बुद्रूक या छोट्याशा गावात झाला. वल्लभ बेनके यांचा शेती हाच प्रमुख व्यवसाय होता.**



वल्लभ बेनके यांना विधानसभेची सलग सहा वेळा उमेदवारी मिळाली. त्यापैकी ते चार वेळा आमदार म्हणून निवडून आले आहेत. १९८५ ते २००९ या कालावधीत त्यांनी आमदारकी भूषवली होती. कुशल संघटक, शेतकऱ्यांच्या प्रश्नाची जाण असणारा आणि प्रशासनावर पकड असणारा अभ्यासू नेता, सर्व सामान्य कार्यकर्त्यांवर जिवापाड प्रेम करणारा, मुत्सद्दी नेता अशी त्यांनी तालुक्यात ओळख निर्माण केली होती. तसेच राष्ट्रवादीचे अध्यक्ष शरद पवार यांचे ते अत्यंत विश्वासू म्हणून ते ओळखले जातात. वल्लभ बेनके यांनी धरणग्रस्तांच्या प्रश्नासाठी त्यांनी मोठा सहभाग घेतला होता.

धरणग्रस्तांच्या प्रश्नांसाठी त्यांनी जवळपास दोन वर्ष संघर्ष केला. वल्लभ बेनके यांनी त्यांच्या कार्यकाळात कांदळी येथे औद्योगिक वसाहतीची स्थापना केली. लेण्याद्री आणि ओझर देवस्थानच्या परिसर विकासासाठी निधी मिळवून दिला. नारायणगाव येथे टोमॅटोचे खरेदी विक्री बाजार केंद्र सुरू केले. प्रशासनावर पकड असणारा नेता म्हणून त्यांनी नावलौकिक मिळवला. मात्र गेल्या चार ते पाच वर्षांपासून ते आजारपणामुळे राजकारणात सक्रिय नव्हते. कृष्णा खोरे विकास महामंडळात त्यांनी महत्वाची भूमिका बजावली होती. बेनके कुटुंब हे राष्ट्रवादीशी एकनिष्ठ असणारे कुटुंब म्हणून या कुटुंबाची ओळख आहे. सध्या विद्यमान आमदार म्हणून त्यांचे सुपुत्र अतुल बेनके यांच्यावर तालुक्याची धुरा आहे.

# पुणे मेट्रोच्या फुकट्या प्रवाशांना दणका! ; ५ महिन्यांत मोठी दंडवसुली

**पुणे : प्रतिनिधी**

**गेल्या पाच महिन्यांत मेट्रोतून वैध तिकिटाशिवाय प्रवास करणाऱ्या सुमारे १,७६४ प्रवाशांवर महामेट्रो प्रशासनाने दंडात्मक कारवाई केली आहे. रुबी हॉल, पिंपरी-चिंचवड आणि सिव्हिल कोर्ट मेट्रो स्थानकावर सर्वाधिक प्रवाशांवर कारवाई करण्यात आली आहे. महामेट्रोने वनाझ ते रुबी हॉल आणि पिंपरी-चिंचवड ते सिव्हिल कोर्ट असा मेट्रोमार्गाचा विस्तार ऑगस्ट महिन्यात केला. त्यानंतर मेट्रोची प्रवासी संख्या वेगाने वाढली. दिवसाला साधारण ५० ते ५५ हजार प्रवासी मेट्रोतून प्रवास करीत आहेत. प्रवाशांना मेट्रोतून प्रवास करण्यासाठी मेट्रोचे अॅप, व्हॉट्स अॅप क्रमांक, 'एक पुणे कार्ड' आणि 'एटीव्हीएम मशिन'च्या माध्यमातून तिकीट काढण्याची सोय आहे. प्रत्येक मेट्रो स्थानकावर तिकीट काउंटर आहे.**




प्रवासी संख्या वाढल्यानंतर मेट्रोने प्रवासाबाबत काही नियम घालून दिले आहेत. त्यानुसार मेट्रोच्या प्रवाशांनी तिकिटाविना प्रवास केल्यास दंडात्मक कारवाईला सुरुवात करण्यात आली आहे. त्यानुसार एक ऑगस्टपासून २०२३ ते जानेवारी २०२४ अखेरपर्यंत १,७६४ प्रवासी वैध तिकिटाविना प्रवास करताना आढळले आहेत. त्यांच्यावर दंडात्मक कारवाई केली आहे. यात वेळेत प्रवास न करणे, दुसऱ्याच मेट्रो स्टेशनवर प्रवास संपविणे, विनातिकीट प्रवास करणे अशा कारणांमुळे ही कारवाई केली आहे. त्यामुळे नागरिकांनी नियम पाळण्याचे आवाहन मेट्रोने केले आहे.

विनातिकीट आढळल्यास दंड

मेट्रो स्थानकात प्रवाशांनी काढलेले तिकीट स्कॅन करूनच प्रवेश मिळतो. बाहेर पडण्यासाठी तिकीट स्कॅन करूनच पडावे लागते. एकदा तिकीट स्कॅन करून आत गेल्यावर प्रवासी बराच वेळ मेट्रोतून प्रवास करतात आणि ते वेळेवर बाहेर पडत नाहीत. त्यामुळे विनातिकीट प्रवास करताना आढळल्यास ८५ रुपये दंड ठेवण्यात आला आहे.

प्रवास संपविण्याचा कालावधी ९० मिनिटांचा

तिकीट खरेदी केलेल्या स्थानकातून ज्या स्थानकापर्यंत प्रवास करायचा आहे. तेथील स्थानकातून बाहेर पडण्याचा कालावधी ९० मिनिटांचा आहे. या वेळेत बाहेर न पडल्यास प्रतितास १० दंड आकाराला जात आहे. हा दंड जास्तीत जास्त ५० रुपयांपर्यंत असणार आहे.

सर्वाधिक कारवाईची पहिली पाच मेट्रो स्थानके

मेट्रो स्टेशनचे नाव कारवाई केलेल्यांची संख्या

रुबी हॉल १९८
पिंपरी-चिंचवड १८७
सिव्हिल कोर्ट १७५
नळस्टॉप १६६
गरवारे १४३

# सैनिक बँकेत सहकार पॅनलचा एकतर्फी विजय

## ▪ शिवाजी व्यवहारे यांचा चौकार ▪ परितर्वन पॅनलचे पानिपत

पारनेर : प्रतिनिधी

**पारनेर तालुका सैनिक सहकारी बँकेच्या निवडणूकीत आ. नीलेश लंके यांच्या मार्गदर्शनाखालील सहकार पॅनलने सर्व सहा जागा मोठया फरकाने जिंकत विरोधी परिवर्तन पॅनलचे पानिपत केले.**

बँकेची निवडणूक जाहिर झाल्यानंतर आ. नीलेश लंके यांनी निवडणूक बिनविरोध करण्यासाठी प्रयत्न केले. स्वतंत्र अर्ज दाखल केलेल्या उमेदवारांनी ताठर भूमिका घेतल्याने सहा जागांवर एकमत झाले नाही. उर्वरीत ११ जागा बिनविरोध झाल्या होत्या. विद्यमान अध्यक्ष शिवाजी व्यवहारे यांना या निवडणूकीत लक्ष्य करण्याचा प्रयत्न केला मात्र त्याचा काही परिणाम झाला नसल्याचे निकालावरून स्पष्ट झाले.

**अनुसूचित जाती जमाती प्रतिनिधी**
आनंदा दादाभाऊ रणदिवे (परिवर्तन पॅनल,१३५२), मधुकर सावळेराम साळवी ( सहकार पॅनल ,२०७१)
इतर मागास प्रवर्ग प्रतिनिधी



दत्तात्रेय बबन भुजबळ (परिवर्तन पॅनल (१३६३ ) शिवाजी तुकाराम व्यवहारे ( सहकार पॅनल ,२०६३)

विमुक्त जाती, भटक्या जमाती व विशेष मागास प्रवर्ग प्रतिनिधी विनायक द्रोणागिरी गोस्वामी (परिवर्तन पॅनल, १२७९)

### शिवाजी व्यवहारे यांचा चौकार

**या निवडणूकीत विद्यमान अध्यक्ष शिवाजी व्यवहारे यांनी सलग चौथ्यांदा विजय साकार करीत विरोधकांना धोबीपछाड दिली. व्यवहारे यांनी बँकेची घडी सुस्थितीत आणून प्रगतीपथावर आणले. त्यांच्या या कामाची दखल घेत मतदारांनी त्यांना पुन्हा संधी दिली. या निवडणूकीच्या निमित्ताने व्यवहारे यांनी चौकार मारला.**

बाळासाहेब बबनराव हिलाळ (सहकार पॅनल, २१४६)
पारनेर कार्यक्षेत्र वगळून सर्वसाधारण प्रतिनिधी
दिपक जिजाबा गायकवाड (परिवर्तन पॅनल, १३५१) राजेंद्र हनुमंतराव जगताप ( सहकार पॅनल, २०३१), हरिभाऊ पोपट खेडकर (सहकार पॅनल, २००५),संतोष शहाजी राक्षे (परिवर्तन पॅनल१३२५), दत्तात्रेय नामदेवराव सोले पाटील( सहकार पॅनल, १९४२),नीलेश अंकुश तनपुरे ( परिवर्तन पॅनल,१३०६)

# रासायनिक खतांचा आरोग्यावर विपरीत परिणाम

## ▪ प्रगतशिल शेतकरी आयुब शेख यांचे प्रतिपादन ▪ कंपोस्ट खत निर्मिती प्रकल्पाचे उद्घाटन



पारनेर : प्रतिनिधी

**रासायनिक खतांचा आपल्या आरोग्यावर विपरीत परीणाम होत असून त्यामुळे विविध आजारांना सामोरे जावे लागते. ते टाळण्यासाठी कंपोस्ट खतांचा शेतीमध्ये वापर करणे आवश्यक असल्याचे मत प्रगतशिल शेतकरी आयुब शेख यांनी व्यक्त केले.**

मुख्यमंत्री माझी शाळा, सुंदर शाळा या अभियानांतर्गत पारनेर पब्लिक स्कुल ॲण्ड ज्युनिअर कॉलेज ऑफ सायन्स येथे प्रगतशिल शेतकरी आयुब शेख यांच्या हस्ते कंपोष्ट खत निर्मिती प्रकल्पाचे उदघाटन करण्यात आले. त्यावेळी त्यांनी उपस्थित विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

यावेळी बोलताना शेख यांनी सांगितले की, सर्व शरीरावर अपायकारक आजारांचा हल्ला होत आहे. तो टाळण्यासाठी आपण शाळेबरोबरच घरीही कंपोस्ट खत निर्मितीसाठी प्राधान्य दिले पाहिजे. जेणेकरून आपल्या पुढील आयुष्यात आपणास

### विद्यार्थ्यांना प्रोत्साहन देणार

**कंपोस्ट खत निर्मिती प्रकल्प उभारून कंपोष्ट खताचा वापर करण्याचा संदेश देण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे. या प्रकल्पाचा उद्देश विद्यार्थ्यांना समजावून सांगण्यात येऊन विद्यालयाबरोबरच घरीही कंपोस्ट खत निर्मिती प्रकल्प सुरू करण्यासाठी विद्यार्थ्यांना प्रोत्साहन देण्यात येणार आहे.**

**गिताराम म्हस्के**
**प्राचार्य, पारनेर पब्लिक स्कुल ॲण्ड ज्युनिअर कॉलेज ऑफ सायन्स**

विद्यार्थ्यांनी उद्याच्या सुदृढ व निरोगी भारतातील नागरीकांचे स्वप्न साकार करण्यासाठी सकस व निरोगी अन्नधान्य निर्मितीवर भर देण्याचा आग्रह धरला पाहिजे. आपल्या घरातील शिल्लक अन्न, झाडांचा पाला पाचोळा याचा वापर करून कंपोष्ट खत निर्मितीवर भर दिला पाहिजे. रासायनिक खतांच्या अति वापरामुळे शेतीमध्ये पिकविल्या जाणाऱ्या अन्नधान्यातून पालेभाज्यांतून निरोगी अन्नधान्य व पालेभाज्या उपलब्ध होऊ शकतील व सुदृढ व निरोगी आयुष्य जगता येईल.

कंपोस्ट खत निर्मिती प्रकल्पाच्या उदघाटनप्रसंगी विद्यालयातील विद्यार्थी, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते. दिपक जाधव यांनी सुत्रसंचलन करीत उपस्थितांचे आभार मानले.


# श्री गणेश जन्मोत्सव निमित्ताने निघोजला वरद विनायक अखंड हरिनाम सप्ताह

## ▪ अष्टविनायक पालखी ज्योत यात्रा ▪ विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन

निघोज : प्रतिनिधी

**निघोज परिसरातील तनपुरेवाडी ( मुलिकानगर ) येथे श्री गणेश जन्मोत्सव निमित्ताने सोमवार दि.१२ ते बुधवार दि.१४ पर्यंत वरद विनायक अखंड हरिनाम सप्ताहाचे आयोजन करण्यात आले असल्याची माहिती मुलिकानगर व निघोज ग्रामस्थांनी दिली आहे.**

सप्ताहाचे हे १३ वे वर्ष असून कैलास महाराज येवले आळंदी, तुषार महाराज गुंड वडगाव गुंड, महंत योगी बेलनाथ महाराज भिमाशंकर, नवनाथ महाराज निकम यांचे किर्तने होणार आहेत. मंगळवार दि.१३ रोजी गणेश जयंती दिवशी सकाळी ६ ते ८ महाअभिषेक, सकाळी १० ते १२ गणेश जन्माचे किर्तन, दुपारी महाप्रसाद, सायंकाळी ४ ते ६ तनपुरेवाडी ते निघोज परिसरात पालखी मिरवणूक, रात्री ७ ते ९ हरिकिर्तन, रात्री ९ वाजता महाआरती, त्यानंतर मान्यवर शुभेच्छा भेट, त्यानंतर महाप्रसाद, रात्रौ ११ नंतर



हरिजागर , शनिवार दि.१० ते सोमवार दि.१२ अष्टविनायक पालखी ज्योतयात्रा आयोजन करण्यात आले असून श्री क्षेत्र महड गणपती ते श्री क्षेत्र निघोज यामध्ये शेकडो भाविक सहभागी झाले आहेत.

सोमवार दिनांक १२ रोजी या यात्रेचे वरदविनायक मंदिर परिसरात जोरदार स्वागत झाले. त्यानंतर विणापूजन होऊन अखंड हरिनाम सप्ताह सुरुवात झाली. गणेश भक्तांनी वरदविनायक दर्शन तसेच अखंड हरिनाम सप्ताह किर्तनाचा व महाप्रसाद लाभ घेण्याचे आवाहन वरदविनायक गणेश मंदिर सेवामंडळ, ससुन डॉक कुलाबा व समस्त ग्रामस्थ मुलिकानगर व निघोज ग्रामस्थ यांनी केले आहे.

# पोखरीतून गाव चलो अभियानाला सुरुवात

## ▪ पवळदर्यात तालुकाध्यक्ष राहुल पाटील शिंदे मुक्कामी ▪ शेतकरी, महिला व युवकांचे घेतले प्रश्न जाणून

पोखरी : प्रतिनिधी

**भारतीय जनता पार्टी गाव चलो अभियानामुळे पारनेर तालुक्यात भाजपमय वातावरण निर्माण झाले आहे. एकीकडे घटकपक्ष आणि विरोधी पक्षात घडामोडी सुरु असताना भाजपाच्या गाव चलो अभियानाला शतप्रतिशत भाजपाच्या दृष्टीने उत्तम प्रतिसाद मिळत असल्याची माहिती पारनेर भाजपा तालुका अध्यक्ष राहुल पाटील शिंदे यांनी दिली.**



पारनेर तालुक्याच्या उत्तर भागातील पोखरी पवळदरा निमदरी या भागातून भाजपा तालुकाध्यक्ष राहुल पाटील शिंदे यांच्या माध्यमातून गाव चलो अभियानाला सुरुवात झाली यावेळी पवळदऱ्यासारख्या अतिशय दुर्गम भागात व आदिवासी पाड्यावर राहुल पाटील शिंदे यांनी मुक्काम केला व त्या भागातील प्रश्न समस्या जाणून घेतल्या.

संपूर्ण देशामध्ये भारतीय जनता पार्टीच्या वतीने गाव चलो अभियान राबवले जात आहे. याचाच भाग म्हणून राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांच्या सूचनेप्रमाणे पारनेर तालुक्यात महसूल मंत्री नामदार राधाकृष्ण विखे पाटील व नगर दक्षिणचे खासदार सुजय विखे पाटील यांच्या नेतृत्वाखाली पारनेर भाजपा तालुका अध्यक्ष राहुल पाटील शिंदे हे गाव चलो अभियान प्रत्येक गावातील प्रत्येक बुथवर राबवले जात आहे.

एकीकडे महायुतीतील घटक पक्ष आणि विरोधी पक्ष यांच्यात अनेक घडामोडी सुरू आहेत. भारतीय जनता पार्टीचे पारनेर तालुक्यातील कार्यकर्ते मात्र राष्ट्रीय पातळीवरून दिलेल्या गाव चलो अभियानात पूर्ण ताकदीने कार्यरत आहेत. याच निष्ठावंत कार्यकर्त्याच्या जोरावर भारतीय जनता पार्टी आपलं शत प्रतिशत भाजपाचे स्वप्न साकार करेल असा विश्वास पारनेर तालुका भाजपचे अध्यक्ष राहुल पाटील शिंदे यांनी व्यक्त केला आहे.

केंद्र आणि राज्य सरकारच्या विविध योजना या तळागाळातील लोकांपर्यंत पोहोचाव्यात तसेच या योजनांच्या लाभार्थ्यांची भेट घेऊन त्यांच्याशी संवाद साधावा या उद्देशाने गाव चलो अभियान राबवण्यात येत आहे. या अभियाना करता प्रत्येक बुधवर एका प्रवासी कार्यकर्त्यांची निवड करून सदर प्रवासी कार्यकर्ता हा त्या बुधवरील सर्व राजकीय, सामाजिक आणि विकासात्मक बाबींचा अभ्यास आणि निरीक्षण करून माहिती संकलन करण्याचे काम करत आहे, याबरोबरच समाजातील विविध घटकांची चर्चा करून येणाऱ्या लोकसभा निवडणुकीमध्ये भारतीय जनता पक्षाला प्रत्येक बुथवर किमान ५१ टक्के मतदान मिळावे याकरता नियोजन करण्यात आले आहे. या प्रवासादरम्यान सर्व ठिकाणी समाजातील सर्वच घटकांनी या कार्यकर्त्यांचे स्वागत करून मोदी सरकार करत असलेल्या कामांबद्दल कृतज्ञता व्यक्त केली. तसेच येणाऱ्या सर्वच निवडणुकांमध्ये नरेंद्र मोदी आणि भारतीय जनता पक्षाच्या पाठी खंबीरपणे उभे राहण्याचा विश्वास सुद्धा व्यक्त केला. या प्रवासी कार्यकर्त्यासोबत तालुक्यातील प्रमुख पदाधिकारी आणि कार्यकर्ते हे देखील गावागावात फिरत असून संपूर्ण तालुका निवडणुकीपूर्वीच भाजपमय वातावरण निर्माण झाले आहे. गाव चलो अभियानादरम्यान अनेक ठिकाणी मतदारांनी आगामी सर्व निवडणुका या भारतीय जनता पक्षाच्या कमळ या अधिकृत निशाणीवर लढवण्याचा आग्रह केला. अनेक ठिकाणी महिला, युवा वर्ग आणि शेतकरी बांधवांनी या कार्यकर्त्यांचे स्वागत केले.

# सुजित झावरेंच्या हस्ते वासुंद्यात साखर व डाळ वाटप

## विखे कुटुंबाला धार्मिक अधिष्ठान : झावरे



वासुंदे : प्रतिनिधी

**श्री प्रभू रामचंद्रांच्या प्राणप्रतिष्ठापन कार्यक्रमानिमित्ताने नगर दक्षिण लोकसभा मतदार संघामध्ये खासदार सुजय विखे पाटील यांच्या माध्यमातून घरोघरी साखर व डाळ वाटप करण्यात येत आहे. पारनेर तालुक्यातही प्रत्येक गावात साखर व डाळ वाटप सुरू आहे.**

तालुक्यातील वासुंदे येथे खासदार सुजय विखे पाटील व अहमदनगर जिल्हा परिषदेचे माजी उपाध्यक्ष सुजितराव झावरे पाटील यांच्या माध्यमातून सर्वसामान्य रेशन कुपनधारक कुटुंबांना साखर व डाळ वाटप शनिवारी करण्यात आले.यावेळी वासुंदे येथील ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी बोलताना जिल्हा परिषदेचे माजी उपाध्यक्ष सुजितराव झावरे पाटील म्हणाले खासदार सुजय विखे यांच्या माध्यमातून नगर दक्षिण लोकसभा मतदारसंघात अनेक विकासाची कामे सुरू आहेत. विखे कुटुंबाला अध्यात्मिक व धार्मिक अधिष्ठान असल्यामुळे श्रीराम प्रभू चंद्रांच्या प्राणप्रतिष्ठापन कार्यक्रमानिमित्ताने संपूर्ण मतदारसंघातील सर्वसामान्य जनतेसाठी साखर व डाळ वाटप करून खऱ्या अर्थाने सामाजिक धार्मिक भावना जोपासली आहे.

यावेळी वासुंदे गावचे सरपंच सुमन सैद, उपसरपंच शंकर बर्वे, प्रगतिशील शेतकरी भाऊसाहेब सैद, वासुंदे सेवा सोसायटीचे चेअरमन नारायण झावरे, माजी चेअरमन दिलीपराव पाटोळे, ढोकेश्वर पाणी वाटप संस्थेचे चेअरमन बाळासाहेब झावरे, रणजीत पाटील, माजी उपसरपंच लहानभाऊ झावरे, ज्येष्ठ नेते बाळासाहेब पाटील, लक्ष्मण झावरे, मारुती उगले गुरुजी, सुदाम भालके, खंडू टोपले, बाळासाहेब शिंदे, शरद पाटील सर, पोपट हिंगडे, दत्तात्रय बर्वे, विलास साठे, भिमाजी गायखे, अशोक झावरे, आदी वासुंदे येथील ग्रामस्थ महिला भगिनी यावेळी मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

# लोणी मावळ्यात शेंडकर गुरुजींची जयंती साजरी

लोणी मावळा : प्रतिनिधी

**पारनेर तालुक्यातील लोणी मावळा सारख्या दुर्गम भागात भैरवनाथ शिक्षण प्रसारक मंडळाची स्थापना करून १९९२ साली श्री छत्रपती शिवाजी विद्यालयाची मुहूर्तमेढ लावणाऱ्या आदर्श शिक्षक गणपत महादू शेंडकर गुरुजी उर्फ भाऊ यांची जयंती छत्रपती शिवाजी विद्यालयात मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली.**

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी भैरवनाथ शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष नानाभाऊ मंजाबा मावळे होते तर प्रमुख उपस्थिती म्हणून संस्थेचे सचिव नवनाथ गणपत शेंडकर होते.

यावेळी प्रास्ताविक करताना विद्यालयाचे उपशिक्षक बाबासाहेब दौंड सर यांनी सांगितले की ६ फेब्रुवारी १९३३ या दिवशी माता सईबाई व पिताश्री महादू यांच्या पोटी जन्म झाला.त्यांचे नाव गणपत असे ठेवण्यात आले. त्यांचे प्राथमिक शिक्षण लोणीमावळा व बाभुळवाडे येथे झाले तर संगमनेर येथे डी. एड प्रशिक्षण पूर्ण केले. त्यानंतर त्यांनी प्राथमिक शिक्षक म्हणून सुमारे ३९ वर्ष चार महिने ज्ञानदानाचे पवित्र कार्य केले.

गावात फक्त प्राथमिक शिक्षणाची सोय होती त्यामुळे माध्यमिक शिक्षण घेण्यासाठी विशेषतः मुलींना खूप अडचणी येत असल्यामुळे त्यांचे शिक्षण येथेच थांबले जायचे या बाबी लक्षात घेऊन शेंडकर गुरुजींनी आपल्या गावात माध्यमिक विद्यालय सुरू करण्याचे ठरविले.गावातील मान्यवर बुजुर्ग



व्यक्तींच्या सहकार्याने भैरवनाथ शिक्षण प्रसारक मंडळाची स्थापना केली. संस्थापक म्हणून त्यांनी आयुष्याच्या शेवटपर्यंत काम पाहिले.

यावेळी बोलताना विद्यालयाचे मुख्याध्यापक मच्छिंद्र राऊत यांनी सांगितले की फक्त तीस विद्यार्थी संख्येवर १९९२ साली सुरू झालेल्या श्री छत्रपती शिवाजी विद्यालयात सध्या २७० विद्यार्थी शिक्षण घेत आहेत.या विद्यालयात शिकलेले विद्यार्थी पीएसआय ,दारूबंदी व उत्पादन शुल्क अधिकारी , डॉक्टर , इंजिनिअर , वकील , शिक्षक , पोलीस , संरक्षण सेवा आणि शासनाच्या विविध विभागांमध्ये आजही उत्कृष्ट नोकरी करत आहेत.

यावेळी बोलताना संस्थेचे सचिव श्री नवनाथ शेंडकर सर म्हणाले की दरवर्षी सहा फेब्रुवारी रोजी विद्यालयात वक्तृत्व , निबंध रांगोळी , चित्रकला स्पर्धांचे आयोजन करण्यात यावे.या स्पर्धांमध्ये सहभागी होणाऱ्या सर्व स्पर्धकांना मोठ्या प्रमाणात शालेय साहित्य स्वरूपात बक्षीस देण्याचे जाहीर केले.याप्रसंगी बोलताना विद्यालयाचे उपशिक्षक बाबाजी मावळे यांनी कै. शेंडकर गुरुजी यांच्या कार्याविषयी माहिती दिली.

अध्यक्षीय भाषणात बोलताना नानाभाऊ मावळे यांनी भैरवनाथ शिक्षण प्रसारक मंडळ स्थापना व श्री छत्रपती शिवाजी विद्यालय लोणीमावळा या विद्यालयास मान्यता मिळणेकामी अनेकांचे सहकार्य लाभले आणि कै. गणपत महादू शेंडकर गुरुजी यांचे स्वप्न साकार झाले. तत्कालीन लोणीमावळा मध्ये असणारी माध्यमिक शिक्षणाची उणीव शेंडकर गुरुजी यांनी भरून काढली त्यामुळे शेंडकर गुरुजी लोणीमावळाचे शिक्षण महर्षी होत. यावेळी संस्थेचे सचिव नवनाथ शेंडकर सर , मुख्याध्यापक मच्छिंद्र राऊत , हरीभाऊ जाधव , बाबासाहेब दौंड ,विकास शेंडकर , बाबाजी मावळे , बाळासाहेब मापारी , रघूनाथ पवार , संतोष झरेकर , भरत पडवळ , सौ एल एस गुंड , आदिनाथ वाघ , राजाराम भोर , मोठ्या प्रमाणात ग्रामस्थ व पालक आणि विद्यालयातील सर्व विद्यार्थी बंधू भगिनी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन बाबासाहेब दौंड यांनी केले तर सर्वांचे आभार रघुनाथ पवार यांनी मानले.

# किशोरवयीन मुलींचे डॉ. पठारे यांच्याकडून समुपदेशन

## पारनेर पब्लिकमध्ये मासिक पाळी व्यवस्थापनावर व्याख्यान

पारनेर : प्रतिनिधी

**मासिक पाळी व्यवस्थापनावर पारनेर पब्लिक स्कुल ॲण्ड ज्युनिअर कॉलेज ऑफ सायन्स येथे आयोजित करण्यात आलेल्या व्याख्यानमालेत डॉ. पद्मजा पठारे यांनी किशोरवयीन मुलींचे समुपदेशन केले.**

मुख्यमंत्री माझी शाळा, सुंदर शाळा या अभियानांतर्गत पारनेर पब्लिक स्कुल अॅण्ड ज्युनिअर कॉलेज ऑफ सायन्समध्ये मासिक पाळी व्यवस्थापनावर डॉ. पठारे यांच्या व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. त्यावेळी त्यांनी किशोरवयीन मुलींना मार्गदर्शन केले.

किशोरवयीन विद्यार्थीनींशी संवाद साधताना डॉ. पठारे यांनी सांगितले की, मासिक पाळीच्या दिवसांमध्ये योग्य पध्दतीचा आहार घेऊन शारीरीक व मानसिक दृष्टया सुदृढ होणे अपेक्षित आहे. महिला कोणत्याही क्षेत्रात पुरूषांच्या खांद्याला खांदा लावून काम करतात. वेळ आली तर न घाबरता, न डगमगता कोणत्याही क्षेत्रामध्ये आपण आपले कर्तुत्व सिध्द केले पाहिजे हे सांगताना डॉ. पठारे यांनी कवी मंगेश पाडगांवकर यांची कविता सादर केली. महिला सक्षमीकरणावर भर देण्याची आग्रही मागणीही त्यांनी केली.

सॅनिटरी पॅड डिस्पोजल मधील




▪ **मासिक पाळी व्यवस्थापनावर पारनेर पब्लिक स्कुल अ‍ॅण्ड ज्युनिअर कॉलेज ऑफ सायन्स येथे डॉ. पद्मजा पठारे यांचे व्याख्यान झाले.**

विद्यालयातील मशिनचे उदघाटन यावेळी डॉ. पठारे यांच्या हस्ते करण्यात आले. सॅनिटरी पॅड वापरासंदर्भातही मार्गदर्शन करीत त्यांनी प्रात्यक्षिकही दाखविले. पारनेर पब्लिक स्कुलमध्ये विद्यार्थ्यांच्या सर्वांगिण विकासासाठी राबविण्यात येत असलेल्या विविध उपक्रमांचे डॉ. पठारे यांनी कौतुक केले. शालेय शिक्षणाबरोबरच विविध क्षेत्रात या शिक्षण संकुलाने आपले वेगळेपण जपल्याचे गौरवोद्गारही त्यांनी काढले.

कार्यक्रमासाठी संस्थेच्या अध्यक्षा सविता म्हस्के, नलिनी गायकवाड, योगिता राऊत उपस्थित होत्या. कार्यक्रमाचे सुत्रसंचलन सविता सविता कानवडे यांनी केले तर वंदना वाघमारे यांनी आभार मानले.

'पारनेर दर्शन' हे पत्रक मुद्रक,प्रकाशक व मालक देविदास रामभाऊ आबूज यांनी ओंकार ऑफसेट, कॉलेज रोड, पारनेर ४१४३०२ अहमदनगर (महाराष्ट्र) येथे छापून 'पारनेर दर्शन' कार्यालय, कॉलेज रोड,पारनेर ४१४३०२,जि.अहमदनगर (महाराष्ट्र) येथून प्रसिद्ध केले. संपादक : देविदास रामभाऊ आबूज मोबा.९४२१४७८२८३ ई- मेल : deviabuj@gmail.com
'PARNER DARSHAN' Printer,Publisher And Ower By DEVIDAS RAMBHAU ABUJ Printed At OMKAR OFSSET Collage Road,PARNER-414302 Dist-Ahmednagar (M.S)
Editor-DEVIDAS RAMBHAU ABUJ ▪ Mob : 9421478283 ▪ Email : deviabuj@gmail.com